
**बिसेन डेन्टल केअर**
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)

ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे




फॅशन कॉर्नर & गिफ्ट सेंटर प्रो. पराग आर. कटरे मो. 8698142221
**राही जनरल एण्ड स्टेशनरी**
कामठा चौक, कामठा रोड, आमगांव जि. गोंदिया (महा.)


बेरार टाईम्स द्वारा प्रकाशित पर्यटन पुस्तिका उपलब्ध अंक व जाहिरातकरिता संपर्क स्थळ



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१० गोंदिया | अंक ०९ | बुधवार,दि.०३ फेबुवारी २०२१ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2019-2021


# माहिती कार्यालय अधिकाऱ्याविना

**गोंदिया:** शासन व प्रशासनात समन्वय साधण्यात प्रशासनात महत्वाचा विभाग मानला जाणाऱ्या जिल्हा माहिती अधिकारी कार्यालयच रिक्तपदांचा शाप लागला असून जिल्हा माहिती अधिकारीपदासह महत्वाची सहा पदे रिक्त पडून आहेत. त्यामुळे शासनाच्या कामकाजावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे मागील अडीच वर्षांपासून जिल्हा माहिती अधिकाऱ्याचे पद प्रभारीच्या खांद्यावर लादण्यात आला आहे. त्यामुळे शासन प्रशासनाच्या सुचना माहिती पुरविण्यात प्रशासनाला दमछाक होत असून कार्यालयात कार्यरत कर्मचाऱ्यांना तारेवरची कसरत करावी लागत आहे.





शासनाच्या ध्येय धोरणाची प्रचार प्रसिद्धी करणे, एखादे मंत्री, वरिष्ठ अधिकारी यांचा जिल्ह्यात दौरा असल्यास त्याची माहिती वृत्तपत्रासह संबंधित विभागाला देणे, तर वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या बातम्या शासन प्रशासनापर्यंत पोहोचविण्याचे कार्य जिल्हा माहिती अधिकारी कार्यालयाच्यावतीने करण्यात येते, त्यातच गोंदिया जिल्हा आदिवासी बहूल व नक्षलग्रस्त जिल्हा असल्याने जिल्ह्यात सदर विभागाचे महत्व आहे. मात्र वरिष्ठ अधिकाऱ्यांची दुर्लक्षित वृत्ती व शासनाच्या उदासीन धोरणामुळे हा महत्वाचा मानला जाणारा विभाग रिक्तपदाचा भार सोसत आहे. त्याचे ताजे उदाहरण येथील जिल्हा माहिती अधिकारी कार्यालयावरुन देता येईल.

येथील कार्यालयात जिल्हा माहिती अधिकारीसह वरिष्ठ लिपीक १ पद, दुरमुद्रक चालक १ पद वाहन चालक ३ पद, रोनियो ऑपरेटर १ पद, माहिती सहायक १ पद, कनिष्ठ लिपीक १ पद, संदेश वाहक १ पद, शिपाई १ पद अशी ११ पदे मंजूर आहे. त्यापैकी सहा पदे मागील एक ते दोन वर्षांपासून रिक्त पडून आहेत.

### अडीच वर्षांपासून अधिकाऱ्याचे पद रिक्त

मागील ७ जून २०१८ पासून म्हणजेच अडीच वर्षांपासून येथील जिल्हा माहिती अधिकाऱ्याचे पद रिक्त असून येथील जिल्हा माहिती अधिकारी विवेक खडसे यांचे स्थानांतरण वाशीम येथे झाल्यानंतर त्यांच्याकडे वाशीम जिल्ह्यासह गोंदियाचाही प्रभार देण्यात आला होता. त्यातच आता काही महिन्यापुर्वी भंडारा येथील जिल्हा माहिती अधिकारी यांच्याकडे गोंदिया येथील प्रभार सोपविण्यात आला आहे. तर वरिष्ठ लिपीकाचे पद १ ऑक्टोबर २०१६ पासून म्हणजेच मागील चार वर्षांपासून रिक्त असून वाहनचालकाच्या तीन मंजूर पदांपैकी दोन पदे रिक्त असून १ दप १ जून २०१८ पासून तर एक पद ३० ऑक्टोबर २०२० पासून रिक्त पडून आहे. तर रोनियो ऑपरेटरचे पदही १ वर्षांपासून रिक्त आहे. त्यामुळे कार्यालयात ११ पदे मंजूर असताना तब्बल ६ पदे रिक्त असल्याने या सहा पदाचा भार कार्यालयातील उर्वरित अधिकारी व शासनस्तरावर याची दखल घेत रिक्तपदे भरून काढणे गरजेचे झाले आहे.

## डिजिटल जनगणनेत ओबीसींचीही जनगणना करा-मंत्री छगन भुजबळ



**मुंबई :** देशाचा अर्थसंकल्प सादर करण्यात आला. डिजिटल जनगणना करू अशी घोषणा अर्थमंत्र्यांनी केली मात्र यात ओबीसी समाजाची जातनिहाय जनगणना करावी या मागणीकडे दुर्लक्ष केले आहे. येणाऱ्या काळात होणाऱ्या जनगणनेत ओबीसींची जातनिहाय जनगणना व्हावी अशी आमची मागणी असल्याचा पुनरुच्चार अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी केला असून एकंदरीतच या अर्थसंकल्पात शेतकरी, बेरोजगार, नोकरदार, छोटे उद्योग यांचा समावेश दिसत नाही, अशी प्रतिक्रिया मंत्री श्री.भुजबळ यांनी व्यक्त केली आहे.

कोरोनामुळे अडचणीत सापडलेल्या अर्थव्यवस्थेला पूर्वपदावर आणण्यासाठी मोठ्या घोषणा होतील अशी अपेक्षा होती. मात्र केंद्र सरकारने कोणतीही मोठी घोषणा केली नाही. या अर्थसंकल्पात महाराष्ट्राच्या वाट्याला काहीही न आल्यामुळे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी अर्थसंकल्पावर टीका केली आहे. भारताचा अर्थसंकल्प मांडताना यात महाराष्ट्र आहे की नाही असा सवाल देखील श्री.भुजबळ यांनी उपस्थित केला.अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी म्हटले आहे की, देशाचा अर्थसंकल्प मांडताना पश्चिम बंगाल, तामिळनाडू, आसाम या राज्यांसाठी हजारो कोटींच्या निधीची घोषणा केली. पण महाराष्ट्रासह इतर राज्याच्या वाट्याला काहीच आले नाही. नाशिक येथील मेट्रो प्रकल्पासाठी २ हजार ९२ कोटी रुपयांची तरतूद केली याचे पालकमंत्री या नात्याने छगन भुजबळ यांनी स्वागत केले. पण याबाबत देखील संदिग्धता आहे. ही मेट्रो नेमकी कशी असेल, याची मार्गिका काय याबाबत स्पष्टीकरण केंद्राने दिले नाही असे देखील श्री.भुजबळ यांनी यावेळी सांगितले आहे.

महाराष्ट्राच्या वाट्याचे जीएसटीचे थकीत पैसे केंद्राने दिले पाहिजेत. कोरोना काळात हजारो लोकांच्या नोकऱ्या गेल्या. हे रोजगार वाढावे यासाठी देखील केंद्राने कोणतेच पाऊल उचलले नसल्याचे श्री.भुजबळ यांनी सांगितले.केंद्र सरकारने लसीकरणाला देखील पुरेसा निधी दिला नाही.

## बार्टीतील आरोपी प्रकल्प अधिकारी महाज्योतीच्या बैठकीला

**नागपूर–** बार्टीतील समतादूत प्रकल्पात अवैध पधद्तीने नियुक्ती मिळवण्याचा आरोप झाल्यानंतर राजीनामा द्यावा लागलेला समतादूत प्रकल्प अधिकारी चक्क महाज्योतीच्या संचालक मंडळाच्या बैठकीला हजर राहिल्याने महाज्योतीच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहेत.

तत्कालीन सामाजिक न्यायमंत्री राजकुमार बडोले यांच्या पुढाकाराने बार्टीच्या समता प्रतिष्ठानातर्फे समतादूत प्रकल्प राबविण्यात येत आहे.त्यासाठी एका खासगी कंपनीमार्फत पदभरती करण्यात आली.त्यात बडोले यांच्या स्वीय सहायंकाचा भाऊ आणि इतर नातेवाईक असल्याचा आरोप झाला होता.विद्यमान सामाजिक न्यायमंत्री यांनी याप्रकरणाच्या चौकशीचे आदेश दिले.त्यानंतर समतादूत प्रकल्पातील प्रकल्प अधिकारी पंकज माने यांनी राजीनामा दिला.

यानंतर महाज्योतीच्या ६ जानेवारी २०२१ च्या संचालक मंडळाच्या बैठकीत माने उपस्थित होते.ओबीसी,व्हीजे,एनटी आणि एसबीसी विद्यार्थ्यासांठी विविध उपक्रम राबवण्यासाठी ही संस्था सुरु करण्यात आली असून मुख्यालय उपराजधानी नागपूरात आहे.मात्र संचालक मंडळाशी काही संबध नसलेला आणि समतादूत प्रकल्प अधिकारी म्हणून राजीनामा दिलेल्या माने यांना संचालक मंडळाच्या बैठकीला बोलावण्यात आल्याने संचालक मंडळातील सदस्यांनी आक्षेप घेतला.

महाज्योतीचे व्यवस्थापक प्रदिप डांगे यांनी माने यांना निमंत्रित केल्याचा आरोप संचालक मंडळाच्या एका सदस्याने केला.एवढेच नव्हे तर विनानिविदा पी.आर.कंपनीला नेमणे,तात्पुरते पद निर्माण करणे आणि विना जाहिरात ते भरणे असले प्रकार सुरु झाल्याचा आरोपही संचालक मंडळातील सदस्यांनी केला आहे.संचालक मंडळाचे सदस्य प्रा.दिवाकर गमे यांनी तर यांसदर्भात आक्षेप घेत फेसबुकवर पोस्ट टाकत सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे.

बहुजन कल्याण ,मदत व पुनर्वसन मंत्री विजय वडेट्टीवार यांनी पंकज माने हे संचालक मंडळाच्या बैठकीला उपस्थित असल्याची कबुली दिली.सोबतच त्याबाबतचे स्पष्टीकरण देत महाज्योती संस्था नवीन असून या संस्थेला अनेक उपक्रम राबवायचे आहेत.त्यामुळे अनुभवी लोकांचा सल्ला संस्थेला हवा आहे.तर माने यांना कुठलेही पद दिले जाणार नाही याची खात्रीने सांगत असल्याचे वडेट्टीवार यांनी स्पष्ट केले.

गडचिरोली,:उच्च तंत्रशिक्षण विभागामार्फत उच्च व तंत्रशिक्षण मंत्रालय हा उपक्रम ४ फेब्रुवारी ला गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली आयोजित करण्यात आलेला आहे. या उपक्रमांतर्गत उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत उच्च व तंत्रशिक्षण विभागातील मंत्रालय व संचालक स्तरावरील अधिकाऱ्यांसमवेत गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे विद्यापीठात प्रत्यक्ष उपस्थित राहून विद्यार्थी, पालक, शिक्षक, प्राचार्य, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यापीठीय कर्मचारी, शैक्षणिक संस्था आदी विविध घटकांच्या अडी-अडचणी ऐकून घेऊन सोडविणार आहेत.

## नगरसेविकेच्या पतीचे महिला अभियंत्याशी गैरवर्तन



**गोंदिया :** येथील नगर परिषद बांधकाम विभागातील महिला नगर अभियंता डॉली मदान यांच्यासोबत महिला नगरसेविका रत्नमाला साहू यांचे पती ऋषिकांत साहूनी केलेल्या गैरवर्तनाच्या विरोधात मंगळवारला(दि.०२)नगरपरिषद कर्मचारी अधिकारी संघटनेने कामबंद आंदोलन करुन निषेध नोंदवला.ही घटना १ फेब्रुवारीच्या दुपारी १.३० वाजता घडली.

महिला अभियंता डॉली मदान यांच्या कक्षात जाऊन ऋषिकांत साहू याने त्यांच्यावर नियमबाह्य काम करण्याचा दबाव टाकला.त्यावर अभियंत्याने नकार दिल्याने साहू यांनी अभद्र व्यवहार करून पाहून घेण्याची धमकी दिली.तसेच कार्यालयातील खुर्च्या फेकल्या.या घटनेची माहिती महिला अभियंता मदान यांनी मुख्याधिकारी करण चव्हाण यांना देवून महिला नगरसेविकेच्या पतीविरुद्ध शहर पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविली.

या प्रकरणात नगर परिषदेच्या सर्व विभाग प्रमुखांनी एकत्र येत भविष्यात अशी घटना घडू नये यासाठी २ फेबुवारीला लेखनीबंद आंदोलन करून कार्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वारावर व्दारसभा घेवून महिला नगरसेविकेच्या पतीने केलेल्या अभद्र व्यवहाराचा निषेध केला.

## राज्यातील तहसीलदारांचे सामूहिक रजा आंदोलन

**गोंदिया –** यवतमाळ जिल्ह्यातील उमरखेड येथील कर्तव्यावर असलेल्या नायब तहसीलदार वैभव पवार यांच्यावर वाळू माफियांकडून हल्ला करण्यात आला. अवैद्य वाळू उत्खननावर कारवाई करण्यासाठी गेलेल्या या तहसीलदारांवर चाकूने हल्ला करत ठार मारण्याचा प्रयत्न करण्यात आला. या घटनेच्या निषेधार्थ महाराष्ट्र राज्य तहसीलदार, नायब तहसीलदार संघटनेने २ फेबुवारीला सामूहिक रजा आंदोलन केले.

आरोपीला लवकरात-लवकर अटक करून त्याच्यावर कठोर शिक्षेची कारवाई करण्यात यावी, या करीत जिल्हाधिकार्यांना निवेदन दिले.महाराष्ट्रात अनेक ठिकाणी अशा घटना घडल्या आहेत. या घटनेच्या निषेधार्थ आवश्यक ती सुरक्षा शासनाकडून प्रदान करण्याबाबतच्या मागण्यांसंदर्भात महाराष्ट्रातील सर्व तहसीलदार आणि नायब तहसीलदार यांनी आज एकदिवसीय रजा आंदोलन करत निषेध व्यक्त केला.

आरोपींना लवकरात-लवकर अटक करण्यात यावी अन्यथा येत्या ८ मार्चपासून संपूर्ण महाराष्ट्रातील राज्य तहसीलदर व नायब तहसीलदार संघटनेच्या वतीने बेमुदत काम बंद आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.२३ जानेवारी २०२१ रोजी अनधिकृत गौणखनिज प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यास गेले असता रात्री ११ वाजताच्या सुमारास रेती माफिया आणि कुख्यात गुंड अविनाश चव्हाण यांनी वैभव पवार यांच्यावर चाकूने सपासप वार करून जीवे मारण्याचा प्रयत्न केला.

# गोंदियातून जाणार दोन राष्ट्रीय महामार्ग




**गोंदिया:** देशाला स्वातंत्र्य मिळण्यापुर्वीपासून गोंदिया शहर लोहमार्गाशी जुळले होते. त्यामुळे या शहराला अधिक महत्व प्राप्त झाले. परंतु राष्ट्रीय महामार्ग नव्हता. गेल्या ३० वर्षांपासून राष्ट्रीय महामार्ग क्रमांक सातशी गोंदिया शहराला जोडण्याची मागणी प्रलंबित होती. ती मागणी पूर्णत्वास येत असून राष्ट्रीय महामार्ग क्रमांक सात गोंदिया शहरातून जाणार आहे. त्याचप्रकारे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४३ ला देखील शहर जुळणार असल्यामुळे शहराचा व्याप पुन्हा वाढणार आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळापासून गोंदिया शहरातून रेल्वे मार्ग गेला होता. त्यामुळे देशाच्या एका टोकावरुन दुसऱ्या टोकावर जाता-येता येत होते. स्वातंत्र्याच्या ७४ वर्षानंतर आता गोंदिया शहर राष्ट्रीय महामार्गाशी देखील जोडला जाणार आहे. गेल्या ३० वर्षापुर्वी राष्ट्रीय महामार्ग क्रमांक सातला राष्ट्रीय महमार्गा क्रमांक सहा गोंदियावरुन नेण्याची मागणी करण्यात आली होती. त्या मागणीला आता यश येत आहे. महामार्ग क्रमांक ५४३ उत्तर दिशेला शहडोल येथे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४३ ला जोडला जाणार आहे. मध्यप्रदेशातील गुलगंज ते छत्तीसगड दरम्यान १०६२ किलोमीटर अंतरावर असलेल्या चाईबासा झारखंडला जोडला जाणार आहे. त्याचबरोबर दक्षिणेकडे ब्रम्हपुरी येथे महामार्ग क्रमांक ३५६ ड ला जोडला जाणार आहे. राष्ट्रीय महामार्ग ३५ वरुन नागपूरवरुन उमरेड, भिवापूर, नागभिडवरुन ब्रम्हपुरीपर्यंत जाणार आहे.

### महामार्ग ७५३ गोंदियातून

दुसरा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७५३ देखील गोंदियातून जाणार आहे. सावनेर, पारशिवनी, रामटेक, तुमसर, तिरोडा, गोंदिया, गोरेगाव, आणि सडक अर्जुनीजवळ कोहमारा येथे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक सहावर समाप्त होणार आहे. केंद्र शासनाने नवीन वर्षांत जिल्ह्याला गोड बातमी दिली असून आता महामेट्रो आणि समृद्धी एक्सप्रेस वे देखील गोंदियापर्यंत आणावा. अशी मागणी जोर धरु लागली आहे.

### गोंदियावरुन २० किलोमीटर लांब

राष्ट्रीय ट्रांसपोर्ट आणि राष्ट्रीय महामार्ग मंत्रालयाचे उपसचिव राजेश गुप्ता यांनी ११ डिसेंबर २०२० ला यासंदर्भात असाधारण अधिसूचना जाहीर केली असून शहडोल ते ब्रम्हपुरी महामार्ग क्रमांक ५४३ करिता गोंदियावरुन २० किलोमीटर लांब जाणाऱ्या मार्गाकरिता ६६ हेक्टर जमिनीच्या भुसंपादनाकरिता गोंदिया, आंभोरा, चंगेरा, जिरूटोला, कटंगीकला, कोरनी, कोरबी, लोधीटोला, मुरपार, नागरा, रजेगाव, रावणवाडी, सतोना, सावरी येथील गावांचा समावेश आहे.

## धापेवाडयाला १०० कोटी व डांगोर्ली बॅरेजची उंची वाढवणार-जलसंपदा मंत्री जयंत पाटील




**गोंदिया:** जिल्ह्यातील बरेचशा सिंचन प्रकल्पाचे काम अपुर्ण असल्यामुळे पाणी टंचाई भासत असते. सिंचन प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याकरीता शासन स्तरावर योग्य तो निधी देण्यात येईल. यासाठी अपुर्ण असलेले सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यात यावे. असे मत जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांनी व्यक्त केले. तिरोडा तालुक्यातील महत्वपूर्ण धापेवाडा प्रकल्पाच्या टप्पा-२ चे कामे निधीअभावी रखडले आहेत. त्यासाठी लागणारा १०० कोटीचा निधी आणि टप्पा-३ च्या पहिल्या स्टेजच्या कामासाठी हवा तेवढा निधी आपण उपलब्ध करून देवू, त्याचबरोबर इटियाडोह, तेढवा उपसा सिंचन योजना तसेच डांगोली बॅरेजची उंची वाढविण्यासंदर्भातील कामेही मागी लावू त्या अनुसंगाने विभागांना सुचना केल्या आहेत. त्यामुळे येत्या दोन वर्षात प्रकल्पांच्या कामांना गती मिळणार आहे, अशी ग्वाही जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांनी दिली.

३१ जानेवारी रोजी गेट वे हॉटेल गोंदिया येथे आयोजित बैठकीत श्री पाटील बोलत होते. यावेळी खासदार प्रफुल पटेल, आमदार मनोहर चंद्रिकापुरे, जिल्हाधिकारी , जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदिपकुमार डांगे, माजी खासदार डॉ.खुशाल बोपचे, माजी आमदार राजेंद्र जैन, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष विजय शिवणकर यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

जलसंपदा मंत्री श्री पाटील म्हणाले, जिल्ह्यात असलेले धापेवाडा उपसा सिंचन प्रकल्प योजना टप्पा-१ चे काम पूर्ण झाले आहे. परंतू धापेवाडा उपसा सिंचन प्रकल्प योजना टप्पा-२, कटंगी मध्यम प्रकल्प, रजेगाव काटी उपसा सिंचन योजना, कलपाथरी मध्यम प्रकल्प, तेढवा शिवनी उपसा सिंचन योजना, झाशीनगर उपसा सिंचन योजना, देवरी नवेगाव उपसा सिंचन योजना, बेवारटोला लघु प्रकल्प, पांढरवाणी उपसा सिंचन योजना, निमगाव लघु प्रकल्प, आसोली लघु प्रकल्पाची कामे अपूर्ण अवस्थेत असल्यामुळे जिल्ह्यात पाणी टंचाई भासत आहे. त्यामुळे अपूर्ण असलेले सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी शासन स्तरावर योग्य तो निधी देण्यात येईल. सद्यस्थितीत जिल्ह्यातील सिंचन प्रकल्पात जो पाणीसाठा आहे त्याचे शेती आणि पिण्यासाठी योग्य नियोजन करावे असे त्यांनी सांगितले.

सभेला गोसेखुर्द प्रकल्पाचे मुख्य अभियंता के.सु.वेमुलकोंडा, भंडारा सिंचन मंडळाचे अधीक्षक अभियंता रा.श्री.सोनटक्के, बाघ इटियाडोह पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता डी.बी.भिवगडे, पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता श्री मानवटकर, मध्यम प्रकल्प विभागाचे कार्यकारी अभियंता अ.प्र.कापसे, भंडारा पाटबंधारे प्रकल्प अन्वेषण विभागाचे कार्यकारी अभियंता आर.आर.बावनकुळे व धापेवाडा उपसा सिंचन प्रकल्पाचे कार्यकारी अभियंता अनिल फरकाडे उपस्थित होते.

## गोंदियात १४२०९ सकारात्मक रुग्ण

**गोंदिया-**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय गोंदिया येथील विषाणू संशोधन व निदान प्रयोगशाळेतून आज २ फेबुवारी रोजी प्राप्त अहवालात जिल्ह्यात ६ रुग्ण कोरोना पॉझिटिव्ह रुग्ण आढळून आले. १२ कोरोना पॉझिटिव्ह रुग्णांनी औषधोपचारातून कोरोनावर मात केल्याने त्यांना आज सुट्टी देण्यात आली.

आजपर्यंत १४,२०९ रुग्ण कोरोना पॉझिटिव्ह आढळले आहे. १३,९०७ रुग्णांनी आतापर्यंत कोरोनावर मात केली आहे. क्रियाशील असलेल्या जिल्ह्यातील बाधित रुग्णांची संख्या १२० आहे. ५९ क्रियाशील असलेले बाधित रुग्ण घरीच अलगीकरणात आहे. आतापर्यंत जिल्ह्यातील १८२ रुग्णांचा मृत्यू झाला. जिल्ह्यातील कोरोना बाधित रुग्ण आजारातून बरे होण्याचे प्रमाण ९२.९० टक्के आहे. बाधित रुग्णांचा मृत्यू दर १.२० टक्के आहे तर डब्लिंग रेट २२६.८ दिवस आहे.

## मनसेचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन



**गोंदिया.** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्यावतीने आज मंगळवारला जिल्हाधिकारी कार्यालया समोर जिल्हाध्यक्ष मनीष चौरागडे, हेमंत लिल्हारे यांच्या नेतृत्वात धरणे आंदोलन करण्यात आले. केंद्र सरकारने पेट्रोल, गॅस, डिझेलचे वाढविलेले दर कमी करावे राज्य सरकारने लॉकडाऊनच्या काळातील ३ महिन्याचे वाढीव वीज बील माफ करावे,बिरसी विमानतळ येथील प्रकल्पग्रस्त कामगारांना प्रकल्पात सुरक्षा रक्षक म्हणून कामावर घेण्यात यावे.मोक्षधाम परिसरातील घनकचरा (डम्पींग यार्ड) व्यवस्था शहरातून बाहेर करण्यात यावे,जिल्हाधिकाऱ्याच्या शासकीय इमारतीचे व रोडाचे (सौंदयीकरण) बांधकाम विना टेंडर परवानगी करण्यात आले. त्यातील दोषी कार्यकारी अभियंता जावेद यांच्यावर कार्यवाही करण्यात यावे,एसी.न लावता दोन वेळा बिल काढणाऱ्या अधिकारी व ठेकेदावर गुन्हा दाखल करण्यात यावे आदी मागण्यांना घेऊन हे आंदोलन करण्यात आले.आंदोलनात जिल्हा उपाध्यक्ष मुकेश कुमार मिश्रा, लेखू रहांगडाले,सुरेश ठाकरे, ब्रजभुषण बैस,शैलेश जांभूळकर, राजेश नागोसे, क्षितिज वैद्य, रजत बागडे, जिल्हा सचिव निखिल ढोंगे, अमोल लांजेवार,राणासिंह नागपुरे, रोहित उके, झुल्लासिंह बरेले लोकेश बनाफट, निखिल गडपायले, संदीप चवरे व सर्व पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

## अगणित प्रस्तावानंतरही तलाव "जैसे थे"

**गोंदिया:** शहराच्या मध्यभागी रेल्वे शासनाच्या जागेवर सुमारे २६ एकर जागेत प्रशस्त असे तलाव आहे. या तलावातील पाणी सिंचनाच्या कामी देखील येत नाही. तलावाच्या सौंदर्यीकरणाकरिता येथील पालिकेचे पदाधिकारी तसेच इतर नेते प्रयत्नशील आहेत. मात्र अद्याप ठोस पाऊल उचलले गेले नव्हते. पालिकेने हा मुद्दा प्रामुख्याने घेत सौंदर्यीकरणाचा आराखडा तयार केला. त्याला पालिकेने मंजूरी देखील दिली. २५ कोटी रुपयांचा प्रस्ताव असून शासनाकडे सादर करण्यात आला. त्यानंतर सातत्याने त्याचा पाठपुरावा झाला. परंतु अद्यापही त्या प्रस्तावावर सकारात्मक तोडगा निघाला नसल्याने तलाव अद्यापही बकाल स्वरुपात आहे.



गोंदिया शहराच्या पश्चिम भागात रेल्वेच्या मालकीचे तलाव अहे. या तलावातील पाणी आजघडीला रेल्वेप्रशासन वापरत आहे. जुन्या काळात रेल्वे प्रशासनानेच आपली पाण्याची गरज भागविण्याकरिता या तलावाचे बांधकाम केले होते. मात्र सध्या फक्त रेल्वे गाड्या धुण्याकरिता येथील पाण्याचा वापर होतो. त्यामुळे तलावाकडे दुर्लक्ष झाले. तलावाच्या दोन बाजूच्या जमिनीवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाले. तलावात गाळ साचले असून जलपर्णीचे साम्राज्य आहे. हा तलाव सौंदर्याच्या प्रतीक्षेत होता. दोन वर्षापुर्वी नगरपालिकेचे अध्यक्ष अशोक इंगळे आणि प्रभाग १४ चे नगरसेवक कल्लू यादव, पंकज यादव यांनी पुढाकार घेत तलावाच्या सौंदर्यीकरणाकरिता प्रयत्न केले. सौंदर्यीकरणासंदर्भात तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांच्याशी देखील चर्चा झाली. त्यांनी प्रस्ताव तयार करुन शासनाकडे सादर करण्यासंदर्भात सुचना केली होती. त्यानुसार पालिकेने २७ जलै २०१८ रोजी सौंदर्यीकरणास मंजुरी प्रदान केली. २५ कोटी रुपयांचा प्रस्ताव तयार करण्यात आला. तो शासनाकडे सादर करण्यात आला. गेल्या कित्येक दशकांपासून बकाल अवस्थेत असणारा हा तलाव आता कात टाकणार अशी अपेक्षा होती. परंतु अद्यापही त्या प्रस्तावावर निर्णय राज्य शासनाने घेतला नाही. त्यामुळे हा प्रस्ताव शासन दरबारी तसाच पडून आहे.

### सौंदर्यीकरणात या कामांचा होता समावेश

सौंदर्यीकरण करताना तलावाच्या चारही बाजूंना पायी चालण्याकरिता वर्किंग ट्रँक तयार करण्यात येणार आहे. त्यावर ठिकठिकाणी विद्युत रोषणाई होणार आहे. तलावाच्या मध्यभागी टापू तयार करुन त्या ठिकाणी बगीचा तयार करणे, बागेत भगवान शंकर आणि सिंधी समाजाचे आराध्य झुलेलाल यांची प्रतिमा ठेवणे आणि टापूवर जाण्याकरिता रस्ता यासह सुरक्षा भिंत, नौकानयन यांचा समावेश होता.

### यापुर्वीही झाले प्रयत्न

यापुर्वी देखील रेल्वे तलावाच्या सौंदर्यीकरणाकरिता अनेकदा प्रयत्न करण्यात आले. खुद तत्कालीन केंद्रीयमंत्री प्रफुल्ल पटेल यांनी तलावाच्या सौंदर्यीकरणाकरिता तत्कालीन रेल्वेमंत्री लालूप्रसाद यदव यांच्याकडे पत्रव्यवहार केला होता. तत्कालीन खासदार चुन्नीलाल ठाकुर यांनी देखील पत्रव्यवहार करण्याची मागणी रेल्वे मंत्रालयाकडे केली होती. सध्या राज्यात महाविकास आघाडीचे शासन आहे. खासदार प्रफुल्ल पटेल यांचे राज्य शासनात वजन आहे. त्यामुळे त्यांनी या विषयात पुन्हा हात घालून विषय मार्गी लावावा, अशी मागणी होत आहे.

## संपादकीय

# अर्थसंकल्पात ओबीसींचा हिस्सा!

गावकुसात राहणाऱ्या मागास जाती म्हणजे ओबीसी. गावकुसाबाहेर राहणारे मागासवर्गीय म्हणजे अनुसूचित जाती–जमाती व भटके विमुक्त! पण काही मागास जाती गावकुसाच्या आतदेखील राहतात. म्हणून साळी, माळी, तेली, तांबोळी, गवळी, न्हावी, धोबी, लोहार, सुतार या अशा जाती म्हणजे ओबीसी समाज !

जातीव्यवस्थेने ओबीसींना “शूद्र’ म्हटले आहे. मनु म्हणतो , शूद्रांना उष्टे अन्न द्यावे, नि:सत्व धान्य व जुने पांघरूण द्यावे (मनुस्मृती १०.१२५). मनु असेही सांगतो कि, क्षमता असूनही शूद्राने धन कमाऊ नये. कारण शूद्राने धन कमावल्यास त्याला धनाचा माज चढतो व तो ब्राह्मणांना पीडा देतो(मनुस्मृती १०.१२९).

म्हणून शूद्र म्हणजे ओबीसी! वेदपंडित सातवळेकर सांगतात कि, कारु कर्म करणारे साधारणत: अलुतेदार बलुतेदार (काही अपवाद वगळता) हे सर्व शूद्र वर्णात येतात. सुतार, लोहार, परीट, कुंभार, न्हावी, गुरव, कोळी, तेली, तांबोळी, साळी, माळी, ठाकर हे सर्व शास्त्रकारांच्या मते शूद्र होते. गुराखी, नट, रथकार, भिल्ल यांनाही शूद्र मानले आहे. मनुस्मृती , यमस्मृती , परशुरामस्मृती , बृहद्पाराशर स्मृती , कुर्मपुराण यांनी शेतकऱ्यांनासुद्धा शूद्र मानले आहे. वेदव्यासस्मृतीमध्ये तर वणिक व कायस्थ यांनाही शूद्रात जमा केले आहे.

अशा तऱ्हेने शेतकरीसुद्धा शूद्र आहेत. मग मागील दोन महिन्यांपासून दिल्लीच्या वेशीवर आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांना न्याय न मिळण्याचे कारण ते “शूद्र’ आहेत , असे आहे काय ?

शूद्र ओबीसींसाठी भारतीय संविधानात अनुच्छेद ३४० लिहिण्यात आले आहे. भारताची राज्यघटना लागू झाल्याबरोबर म्हणजे २६ जानेवारी १९५० रोजीच अनुच्छेद ३४० च्या आधारे शूद्र ओबीसींसाठी आयोग नेमला असता तर त्यांना निदान १९५५ पासून राखीव जागा मिळाल्या असत्या ! परंतु शूद्र ओबीसींसाठी असा आयोग न नेमल्याने डॉ आंबेडकर यांनी १९५१ साली केंद्रीय कायदेमंत्री पदाचा राजीनामा दिला होता.

त्यानंतर या शूद्रांसाठी प्रथम कालेलकर आयोग व नंतर सुप्रसिद्ध मंडल आयोग नेमण्यात आला. मंडल आयोगाच्या शिफारशींनुसार या शूद्र ओबीसींना १९८९ साली(म्हणजे निदान ३५ वर्षे उशीरा !) केंद्र सरकारने राखीव जागा दिल्या. परिणामी १९८९ ते १९९३ या काळात देशात प्रचंड हिंसाचार करण्यात आला व त्यात शूद्रांच्या हिताची आहुति देण्यात आली ! ङ्ककसायाला गाय धार्जिणफ या न्यायाने आजही हे शूद्र आपल्याला गुलाम करणाऱ्यांनाच आपले मुक्तीदाते समजतात. म्हणून या शूद्र ओबीसींना त्यांच्या मुक्तीदात्यांनी अर्थसंकल्पात किती वाटा दिला आहे, हे समजून घेऊ या !

मंडल अहवालानुसार शूद्र ओबीसींची लोकसंख्या ५२% असली तरी सवीच्च न्यायालयाच्या इंदिरा साहनी उर्फ मंडल निर्णयाप्रमाणे त्यांना २७% राखीव जागा देण्यात आल्या आहेत. म्हणून प्रथम मंडल निर्णयाच्या आधारे अर्थसंकल्पातील शूद्र ओबीसींचा वाटा समजून घेऊ या.

सन २०२० – २१ या आर्थिक वर्षाचा केंद्र सरकारचा अर्थसंकल्प ? ३०,४२,२३०/ कोटी एवढा मोठा आहे. त्यात शूद्र ओबीसी व अनुसूचित जाती या दोहोंसाठी मिळून ? ८५,०००/ कोटी एवढा निधी ठेवण्यात आला आहे. त्यातून अनुसूचित जातींसाठी असलेला ? ८३,२५७/ कोटींचा निधी बाजूला काढला तर शूद्र ओबीसींसाठी

? १७४३/ कोटी एवढाच निधी ठेवला आहे, हे समजते. एकूण अर्थसंकल्पाशी तुलना केली तर तो अवघा ०.०६% एवढाच भरतो ! म्हणून २७% राखीव जागांप्रमाणे हिशोब केला तर या शूद्र ओबीसींना २६.९४% निधी नाकारण्यात आला आहे.

मग या शूद्र ओबीसींचा २७% प्रमाणे अर्थसंकल्पात किती वाटा होतो? चालू वर्षाचा केंद्र सरकारचा अर्थसंकल्प? ३०,४२,२३०/ कोटी एवढा मोठा आहे. त्याचे २७% म्हणजे ? ८,२१,४०२/ कोटी एवढा निधी शूद्र ओबीसींना मिळायला हवा. प्रत्यक्षात त्यांना देऊ केले आहेत ? १,७४३/ कोटी ! म्हणजे राखीव जागांच्या प्रमाणे विचार केला तर शूद्र ओबीसींना ? ८,१९,६५९/ कोटी एवढा निधी नाकारण्यात आला आहे !

समजा, एखाद्या घरात वडिलांचे निधन झाले. त्यांचे अंत्यसंस्कार–क्रियाकर्म आटोपल्यावर घरातील जुनी जाणती माणसे एकत्र बसून वडिलांच्या संपत्तीची वाटणी करतात. या वाटणीत एखाद्या भावाबहिणीला कमीजास्त हिस्सा मिळाला तर वादावादी होते. शेवटी सर्वांचे समाधान काढणारा तोडगा काढावा लागतो. मग ती वाटणी सर्वमान्य होते.

जसे वडिलांच्या संपत्तीच्या वाटणीचे तसेच देशाच्या संपत्तीचे ! आपण शाळेत प्रतिज्ञा म्हणतो कि , “भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.’ म्हणजे भारत माझा बाप आहे ! मग माझ्या बापाच्या संपत्तीतील म्हणजेच देशाच्या अर्थसंकल्पात माझा योग्य तो वाटा मला मिळायला नको काय ? याच न्यायाने पाहू गेल्यास शूद्र ओबीसींना त्यांच्या राखीव जागांच्या प्रमाणात अर्थसंकल्पात वाटा मिळायला नको काय ?

आश्चर्य म्हणजे एवढा प्रचंड निधी नाकारलेला असूनही हे शूद्र ओबीसी हूं कि चूं करीत नाहीत ! ते एका शब्दानेही कोणाला दुखावत नाहीत कि कोणाला जाब विचारीत नाहीत. शिंगे नसलेल्या फार मोठ्या बहुदूधी बहुगुणी गाईप्रमाणे ती यांबाबत चर्चादेखील करीत नाही ! याचा अर्थ असा कि, वडिलांच्या संपत्तीत सख्या भावाबहिणीला एक रुपयाही न सोडणारा ओबीसी भाऊ केंद्र सरकारच्या ? ८,१९,६५९/ कोटी एवढ्या प्रचंड निधीवर हसत हसत पाणी सोडतो !

महादानी कर्णासह जगातील सगळ्या दानशूर व्यक्तींनी ज्यांच्या पायाचे पाणी तीर्थ म्हणून प्राशन करावे असा हा महाप्रचंड दानी असलेला शूद्र ओबीसी समाज महाप्रचंड श्रीमंत असल्याने या एवढ्या मोठ्या निधीवर पाणी सोडत आहे, असे आपणांस वाटू शकेल. पण वस्तुस्थिती फार वेगळी आहे.

पारंपरिक हस्तकौशल्य असूनही अक्षरओळख नसल्याने ओबीसींना देशात खरीखुरी औद्योगिक क्रांती करता आली नाही. ओबीसींना जेव्हा अक्षरओळख झाली तेव्हा देशातील भांडवलावर बनिया ब्राह्मण उद्योगपतींनी कब्जा मिळवला होता. त्यामुळे प्रतिभावान ओबीसींना उद्योगांसाठी भांडवल मिळू शकले नाही. प्रथम इंग्रजांनी व नंतर देशी उच्च जातीयांनी आधुनिक यंत्रसामग्री आणल्यामुळे लोहार, सुतार, कुंभार अशा ओबीसी जाती पार रसातळाला गेल्या असून ब्राह्मणी धर्मातील पोकळ अध्यात्माच्या आसऱ्याला जाऊन आपले जुने वैभवाचे दिवस पुन्हा येतील, अशी वेडी आशा त्यांना खुणावते आहे. त्यामुळे ब्राह्मणी धर्मांवर आधारलेल्या संघटनांशी शूद्र ओबीसींची नाळ फार घट्टपणे बांधली गेली आहे. ओबीसींचे शिक्षण–आरोग्य, आर्थिक उन्नतीचे मार्ग यांबाबत ब्राह्मणी धर्माचे ठेकेदार कमालीचे उदासीन असून या शूद्र ओबीसींकडे ते केवळ दंगलीतील कच्चा माल म्हणून बघतात. घरात चांगली फरशी बसावी म्हणून हे ओबीसी बैठकीला जातात ! आपल्या मुलाला नोकरी लागावी म्हणून सत्तरी ओलांडलेला ओबीसी पिता मुंबईहून चालत चालत शिर्डीला जातो. मुलीचे लग्न व्हावे म्हणून परवडत नसूनही ओबीसी माता सिद्धि विनायकाला सोन्याच्या नारळाचा नवस बोलते. घरात फरशी बसवण्याइतपत समृद्धी येणे, नोकरी मिळणे, लग्न होणे हे सारे भौतिक प्रश्न आहेत. त्यांची उत्तरे समाजववस्थेत शोधावी लागतात. बैठक अथवा देवळे (किंवा मशीद, चर्च, गुरुद्वारा, विहार इत्यादी धार्मिक स्थाने) यांत त्यांची उत्तरे मिळू शकत नाहीत.

५२% ओबीसी समाजाच्या नोकरी, आर्थिक उन्नती, शिक्षण–आरोग्य आदि भौतिक प्रश्नांची उत्तरे अर्थसंकल्पाच्या निधीत आहेत. ओबीसींना त्यांच्या वाट्याचा अर्थसंकल्प भेटला तर हे प्रश्न सहज सुटू शकतात. परंतु जिथे बाळ रडल्याशिवाय आई त्याला दूध पाजीत नाही तिथे धार्मिक अफूच्या नशेत चूर झालेल्या ओबीसींना त्यांचा अर्थसंकल्पातील वाटा कोण देणार आहे? आमच्या मते ५२% ओबीसी म्हणजे बिन शिंगाची भरपूर दूध देणारी गरीबाहून गरीब गाय आहे जिला दरवर्षी अर्थसंकल्पाच्या माध्यमातून मनुवादी जाहिररित्या चराचरा कापीत असतात !

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करून डोलारे एजन्सीजवळ चंचलबेन स्कूल रोड, गजानन कॉलनी गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# माजी मालगुजारी तलावांचा इतिहास व व्यवस्थापन



### १)माजी मालगुजारी तलावांचा इतिहास

गोंदिया व भंडारा जिल्हयाला तलावांचा जिल्हा म्हणुन ओळखला जातो. दोन्ही जिल्हे मिळून जवळपास लहान मोठे ३५०० तलाव आहेत. त्यापैकी गोंदिया जिल्हयात जवळपास २१३० तलाव आहेत. यापैकी १८८६ तलाव हे माजी मालगुजारी तलाव आहेत.

अंदाजे ३०० ते ३५० वर्षापुर्वी सोळाव्या शतकात तत्कालीन गोंडराजा हिरशहा यांनी भविष्यातील पाण्याची आवश्यकता लक्षात घेता पुर्व विदर्भातील लोकांसमोर असे फर्मान काढले की, “जो कोणी जगंले साफ करुन शेती करेल त्याला ती बहाल केली जाईल व जो कोणी तलाव बांधेल त्याला त्या तलावा खाली जितकी जमीन खुद कास्तकार म्हणुन बक्षीस दिली जाईल”. त्यानुसार या संधीचा उपयोग करुन घेत कोहळी व पोवार समाजाच्या मालगुजारांनी लोकसहभागातुन तत्कालीन सिंचन व्यवस्थापनाची एक परंपरागत पध्दत व भविष्यातील पाणी टंचाई टाळण्याच्या दुरदृष्टीकोनातून सदर तलावांची निर्मिती केली होती.

दुसरे असे की, पुर्व विदर्भातील सरासरी पर्जन्यमान १२०० ते १६०० मी. मी. असल्याने या भागात प्रामुख्याने भात पिक घेण्यात येते. आगष्ट व सप्टेंबर या कालावधीत पावसाची सरासरी जरी बरोबर असली तरी आवश्यक त्यावेळी पावसाने दडी मारल्यामुळे भात शेती धोक्यात येते. त्यामुळे भात पिकास १ किंवा २ सिंचनाच्या पाळीची गरज पुर्ण होण्याच्या दृष्टीकोनातून तत्कालीन गोंडराजा हिरशहा यांचे फर्मानानुसार कोहळी व पोवार समाजाच्या कास्तकारांनी लोकसहभागातुन सदर तलावांची निर्मिती केली होती.

सदर तलांवांची निर्मिती करतांना त्यांच्यातील अभियांत्रीकी ज्ञानाचा वापर करुन पाणी साठवण्यासाठी योग्य असलेल्या जागेची निवड करुनच केली आहे, जेव्हा आजच्यासारखी आधुनिक जमिनिचे उतार मोजण्याचे यंत्रे (डम्पी लेव्हल) अस्तीत्वात नव्हती, ट्रॅक्टर अथवा बुलडोझरांची माहिती नव्हती, टोपो शिट्स नव्हत्या अशा काळात कोहळी व पोवार समाजाच्या कास्तकारांनी लोकसहभातुन सदर तलावांची सुनियोजित पध्दतीने तलावांचे जाळे निर्माण केले. त्यावरुन हे कास्तकार किती होतकरू होते, हे लक्षात येते. सदर तलावांचा खाली विहरी पण बांधल्या आहेत. तलावांच्या शृंखलेची निर्मिती करतांना गावाच्या चारही बाजूंनी तलाव निर्माण केलेले आहेत. तलावातील पुराचे पाणी सांडव्यावरून वाहण्याची जी पातळी असते, ती गावाच्या खाली राहील यांची पण त्यांनी काळजी घेतल्याची दिसते. यामुळे पुराच्या पाण्याचा धोका गावाला पोहचत नाही. एका तलावातील पाणी दुस–या तलावात व त्याचे तीस–या तलावात अशी शृंखला निर्माण करून पाण्याचा नास न होता त्या पाण्याचा पुन:पुन्हा वापर करण्याचे तंत्र वापरण्यात आलेले आहे. भूपृष्ठावर पाण्याचे साठे निर्माण करुन धान पिकाला पाऊस वेळेवर न आल्यास पूरक व्यवस्था म्हणून पाणी देण्यासाठी (संरक्षित सिंचनासाठी) तसेच उसाचे पीक काढून गुळाचे उत्पादन करण्यासाठी हे तलाव बांधले गेले होते असे दिसते. भात व उसाच्या शेतीबरोबरच मत्स्यपालनाची सोयही त्या तलावांच्या आश्रयाने केली गेली होती. गोंड राजाच्या कारकिर्दीत राजाश्रय मिळाल्यामुळे तलावांचा विकास झपाट्याने झाला.

१९ व्या शतकात देशात इंग्रजांचे राज्य आले तेव्हा या तलावांची मलगुजारी वसुली करण्याची मालकी त्या भागातील काही प्रतिष्ठित नागरिकांकडे देण्यात आली व त्याला ममालगुजारफ असे संबोधले गेले. हे मालगुजार लाभधारकांकडुन वसूल केलेल्या रकमेतून ठरावीक रक्कम सरकारकडे जमा करीत असत. पाण्याचे वाटप, देखरेख, दुरुस्ती, गाळ काढणे ही कामे मात्र लाभधारकच करीत. सारा वसुली करण्याच्या सोयीसाठी म्हणून इंग्रजांच्या काळात या तलावांची मालकी मालगुजारांकडे गेली म्हणून त्यांना ‘मालगुजारी तलाव’ असे संबोधले जात होते.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर सन १९५० मध्ये मालगुजारी संपुष्टात आल्यानंतर शासनाने सन १९६३ मध्ये सदर तलाव आपल्या ताब्यात घेतले. परंतू सदर तलावापासून शेतकऱ्यांना सिंचनाचे मुक्त अधिकार (Free Rights) सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार जशेच्या तसेच ठेवण्यात आलेत. सदर तलाव शासनाचे ताब्यात आल्यानंतर सदर तलावांना माजी मालगुजारी तलाव असे संबोधण्यात येऊ लागले.

### २)माजी मालगुजारी तलाव काल व आज

माजी मालगुजारी तलावातील पाणी वाटपासाठी लाभधारकांची एक समिती असे. ही समिती तलावातील पाण्याची उपलब्धता पाहुन प्रत्येकाला किती पाणी द्यायचे हे ठरवीत असे. तलावाच्या देखभाल व दुरुस्तीची कामे या समिती मार्फत लाभधारकांच्या सहकार्यातून होत असत. समितीचा निर्णय अमलात आणण्यासाठी पाणक्याची (पाटकरी) नेमणूक करण्यात येत असे. हा पाणकरी भूमिहीन लोकापैकी असे. ज्याला गरज असेल त्याला तलावातील गाळ आपल्या शेतात नेण्याची परवानगी होती. तलाव आणि यासंबंधीच्या व्यवस्थेवर या समितीचे लक्ष असे व ही समिती राजाला दरवषी पाण्याच्या उपलब्धतेनुसार सारा देत असे.

सन १९५० नंतर तत्कालीन मध्यप्रदेश सरकारच्या (मध्यप्रांत) कायद्यान्वये मालगुजारी संपुष्टत आली सदर मालगुजारी तलाव शासनाने ताब्यात घेतले. शासनाचे नियंत्रण या व्यवस्थेवर आल्यामुळे लोकांचा सहभाग कमी झाला. दुरुस्ती व देखभाल व्यवस्थेच्या अभावी काही तलाव आता नाहीसे झाल्याचे दिसते.

सन १९९९ मध्ये भंडारा जिल्हयाचे विभाजन होवुन गोंदिया जिल्हयाची निर्मिती झाली. विभाजनात गोंदिया जिल्हयात दस्ताऐवजानुसार ० ते १०० हे. सिंचन क्षमतेचे १७४८ व १०० हे. वरील सिंचन क्षमतेचे ३८ असे एकुण १८८६ मा. मा. तलावांची नोंद होती.

सद्यस्थितीत केलेल्या सर्वेक्षणनुसार गोंदिया जिल्हयात ० ते १०० हे. सिंचन क्षमतेचे १४२१ व १०० हे. वरील सिंचन क्षमतेचे ३८ असे एकुण १४५९ मा. मा. तलाव अस्तीत्वात असुन त्याचे मुळ सिंचन क्षमता ३५२४१ हेक्टर आहे.

लोकांचा सहभाग कमी होणे व पर्यायाने शासनावर अवलंबून राहणे या मुळे लोकसहभागातून चालु असलेली एक उत्तम व्यवस्था आता मोडकळीस आल्याचे दिसते सध्या या सगळया तलावांचा उपयोग केवळ खरीपातील भात या पिकाला संरक्षित पाणी देण्यासाठी केला जातो. रब्बीमुळे दुसरे पिक तसेच उसासारखी बारमाही पिके नाहीशी झालेली आहेत.

### ३)माजी मालगुजारी तलावांचे व्यवस्थापन

जोपर्यंत या तलावांचे व्यवस्थापन मालगुजारांकडून व लाभार्थी कडून होत होते तोपर्यंत या तलावांचे बांधकाम व देखभाल दुरुस्ती, कालव्यांची साफसफाई, पाणी वाटप ई. बाबी लाभधारक शेतकरी स्वत: करीत असत व त्यासाठी आवश्यक तो निधी लाभाधारकांकडून गोळा करुन त्याव्दारे ही कामे करीत. पाणी वाटपासाठी पाणकराची नियुक्ती करीत. परंतु मालगुजारी पध्दत नष्ट झाल्याने हे सर्व तलाव शासन/ जिल्हा परिषदाकडे हस्तांतरीत झालेत. तेव्हा पासून या तलावावरील लोकसहभाग कमी कमी होत गेला आहे. या कारणामुळे तलावांची स्थिती दिवसेंदिवस दयनीय होतांना दिसते. या तलावांना जलवैभव पुनश्च प्राप्त करुन द्यावयाचे झाल्यास पुर्वीप्रमाणेच लाभाथी शेतकऱ्यांचा लोकसहभाग वाढविणे आवश्यक झाले आहे.

गोंदिया जिल्हयातील सडक/अर्जुनी तालुक्यात चिचटोला येथील मा. मा. तलाव (गट क्र. ९८) येथे स्थानिक पातळीवर निस्तार धारक शेतकरी हे समुहाने सदर तलावाचे सुरळीत व्यवस्थापन करत असल्याचे कळल्याने मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी लघु सिंचन विभागाचे श्री गोवर्धन बिसेन, शाखा अभियंता यांचे सोबत सदर तलावाला भेट दिली असता असे दिसुन आले की, सदर तलावाच्या पाळीची लांबी ८००.०० मी. असून त्याचे बुडीत क्षेत्र ४८.६३ हेक्टर आहे. सदर तलावास ३ जलविमोचक व २५.०० मी. लांबीचा सांडवा आहे. नहराची लांबी ३.०० कि.मी. असुन तलावाची सिंचन क्षमता निस्तार हक्का प्रमाणे ९८.०० हेक्टर खरिप क्षेत्र आहे. तसेच ५० ते ६० हेक्टर जागेत रब्बी पीक घेण्यात येते.

निस्तार धारक शेतकऱ्यांशी चर्चा केली असता पाणी वाटपाचे व्यवस्थापन योग्य होण्याचे दृष्टीकोणातुन स्थानिक पातळीवर निस्तारधारक शेतकरी लाभार्थ्यांनी मागिल ४० ते ५० वर्षापुर्वी पाणी वापर संस्थेची स्थापना केली आहे. सध्या संस्थेचे अध्यक्ष म्हणून डॉ. दिलीप कापगते व सचिव म्हणून सुभानराव कापगते हे काम बघतात. सदर संस्थेच्या नियंत्रणा खाली शेतक–यांना पाणी वाटप केल्या जाते. तलावाची बरीचशी कामे शेतकरी श्रमदान व लोकवर्गणी द्वारे करीत असून त्याला शेतक–यांचा १०० टक्के प्रतिसाद आहे. लोकवगणी द्वारे जमा झालेल्या रकमेतून संस्थेनी २ जलविमोचकाची दुरुस्ती, पाळीची दुरुस्ती, सांडवा दुरुस्ती व नहराची दुरुस्ती (सिमेंट कॉंक्रीटचे बांधकाम) या प्रमाणे तलावाची दुरुस्ती केली आहे. या व्यतीरिक्त सदर संस्थेनी शेतातील झिरपाद्वारे येणारे पाणी इतरत्र व्यर्थ जावू नये म्हणून ६.०० मी. व्यास व ७.०० मी. खोल विहिरीचे अतिरिक्त साठवणा करिता पक्के बांधकाम सुध्दा केलेले आहे. या विहिरीवर पंप लावून सदर पाण्याचा उपयोग ३० ते ४० हेक्टर अतिरिक्त सिंचनासाठी तसेच शाळेतील परसबागेसाठी करण्यात येते.

शेतकरी सदर तलावापासून खरीप हंगामात ३५ ते ४० क्विंटल प्रति हेक्टर व रब्बी हंगामात ५० ते ६० क्विंटल प्रति हेक्टर प्रमाणे धान पिकाचे उत्पादन घेतात. अशा प्रकारे सिंचन करतांना कुठलाही भेदभाव न करता संस्थेमार्फत सुरळीत सिंचन केले जाते.

वरील प्रमाणे चिचटोला येथिल निस्तार हक्क धारक शेतकऱ्यांची यशोगाथा पाहुन संपुर्ण जिल्ह्यात लोकसहभाग वाढविण्यासाठी मा. मा. तलावासाठी “निस्तार हक्क धारक पाणी वापर संस्था” स्थापित करुन ते व्यवस्थापनासाठी अश्या संस्थेकडे सोपविण्यात यावेत. या तलावावर केवळ खरीप धान पिक घेण्यात येत असलयाने व या पिकास पाणी वापराचे फुकट हक्क असल्याने अश्या संस्थांना केवळ याच कामासाठी तलावाचे लाभक्षेत्रात पिक रचनेत बदल करणे, पिक क्षेत्रात वाढ करणे, खरीप व रब्बी या दोन्ही हंगामात पिक घेणे व जिथे शक्य असल्यास तिथे उन्हाळी व रब्बी हंगामातील पिंकापासुन संस्थेस पाणी पट्टी मिळु शकेल.

खोलीकरण केल्याने व साठा क्षमतेत वाढ केल्याने व पीक क्षेत्रात वाढ झाल्याने या तलावात दिर्घकाळ पाणीसाठा करणे शक्य होईल. ज्या व्दारे या तलावाची मत्स्यव्यवसायासाठी उपयोग करणे शक्य होईल. सध्या अश्या तलावांचे मत्स्य व्यवसायासाठी लिलाव करण्याचे अधिकार जिल्हा परिषदेकडे आहेत. त्याऐवजी हे अधिकार निस्तार हक्क धारक पाणी वापर संस्था कडे दिल्यास त्यांचे उत्पन्नात भर पडेल. शिवाय आजच्या स्थितीत पाणी वापर करणारे शेतकरी व मत्स्यव्यवसाय करण्यात कुठलाच समन्वय नसल्याने शेतकरी जास्तीत जास्त पाणी तलावातुन वापरुन तलाव रिकामे करतात ज्यावद्वारे मत्स्यव्यवसाय करणारे लोक या तलावात मत्स्यव्यवसाय करण्यास पुढे येत नाही. तेव्हा पाणी वापर संस्थेकडे हे अधिकार दिल्यास असा समन्वय घालणे शक्य होईल. ज्या व्दारे पिक क्षेत्रात वाढ व मत्स्यव्यवसायामुळे मोठया प्रमाणात रोजगार उपलब्ध होवुन लोकांचे दरडोई उत्पन्नात भर पडेल व पाणी वापर संस्था सक्षम होतील.

**गोवर्धन बिसेन**
**शाखा अभियंता,**
**लघु पाटबंधारे विभाग,जि.प.गोंदिया**

# आपल्या समस्यांविषयी हितगुज साधण्यासाठी महिलांनी एकत्रित यावे : सीमाताई कोरोटे



**चिचगड :** दहा टक्के राजकारण व नव्वद टक्के समाज कारण करने, हे आ.सहषराम कोरोटे यांची संकल्पना आहे. ते आमदार झाल्यावर सर्व जाती धर्मातील लोकांचे हित समजून त्याचे समस्याचे निराकरण करुण त्यांची सेवा करण्यासाठी सदैव तत्पर आहेत. या करिता क्षेत्रातील लोकांचे अडीअडचणी समझने गरजेचे आहे. परिसरातील लोक आमदार साहेबांच्या संर्पकात येवू शकतात. परंतु गृहकार्य करणा?या महिला ह्या संपकार्पासुन वंचित राहतात. या करिता महिलांनी आपसातील मतभेद विसरून आपल्या समस्या विषयी हितगुज साधन्यासाठी अशा कार्यक्रमात एकत्रित यावे असे प्रतिपादन सीमाताई सहषराम कोरोटे यांनी केले.

देवरी तालुका महिला कॉंग्रेसच्या वतीने मकर संक्रांति निमित्य महिलांकरिता सामूहिक हळदी– कुंकू व महिला मेळाव्याचे यशस्वी आयोजन रविवार चिचगड येथील वीर बिरसा मुंडा यांच्या स्मारका जवळ करण्यात आले होते. या कार्यक्रमात मार्गदर्शन करतांनी बोलत होत्या.

या कार्यक्रमाचे उद्घाटन कार्यक्रमाचे संयोजिका सीमाताई कोरोटे यांच्या हस्ते आणि जि.प.च्या माजी अध्यक्ष उषाताई मेंढे यांच्या अध्यक्षतेखली व दिप प्रज्वलन महिला कॉंग्रेसच्या जिल्हाध्यक्ष उषाताई शहारे यांच्या हस्ते पार पडले. याप्रसंगी संदीप भाटिया, माधुरिताई कुंभरे, छबुताई ऊके, कल्पनाताई गोस्वाम, अर्चनाताई नरवरे, किरणताई राऊत, पूजाताई कटकवार, धनश्रीबाई गंगासागर, मीराबाई कुंजाम, प्रमिलाताई गावळ, आनंद अत्तरगडे., कविताताई वलदे, लीलाबाई मूंदी, फुलवंताबाई बगडे. रिया, सुभद्राताई अगडे, कलाबाई सरोटे, प्रमिलाबाई घासले, जसवंताताई भारद्वाज, निशा परिहार उपस्थित होते.

या कार्यक्रमाच्या आयोजनाकरिता चिचगड च्या ग्रा. पं.सदस्य शाईनताई सैय्यद, सीमाताई राऊत, सुनीता नंदागवळी, राधिकाताई धरमगुळे, वत्सलाबाई लटये, निताताई कोल्हारे, नसीमा शेख, किरणताई राऊत, प्रीति सलामे, सुमनताई सलामे, लक्ष्मीताई धानगाये, पूजा कोल्हारे, शोभाताई तोमर, अश्मिता धानगाये, ममता कोल्हारे यांच्या सह देवरी व चिचगड क्षेत्रातील महिला कॉंग्रेस चे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सहकार्य केले.

# माँ जिजाऊ व सावित्रीचे आदर्श अंगीकारावे:विमल कटरे



**सालेकसा :** बहुजन समाजातील नागरिकांना शिक्षणाच्या प्रवाहात आणून त्यांच्यावरील सामाजिक अन्याय अत्याचार दूर करण्यासाठी माँ जिजाऊ तसेच क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी महान त्याग केला. त्याच अनुषंगाने महात्मा ज्योतीबा फुले, माँ जिजाऊ व सावित्रीच्या आदर्श स्वीकारून बहुजनांनी समाजहीत जोपासत कार्य करावे, असे आवाहन महिला दक्षता समिती पोलिस ठाणे सालेकसाचे अध्यक्ष सौ. विमल कटरे यांनी केले.

महात्मा ज्योतीबा फुले, राष्ट्रमाता जिजाऊ व माता सावित्री ज्योतीबा फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून तिरखेडी जिल्हा परिषद अंतर्गत येणाऱ्या गावात सौ. विमल कटरे यांच्या वतीने जनजागृती करण्यात येते आहे. त्याच अनुषंगाने गांधीटोला परिसरातील गावात आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. आजही बहुजन समाजातील नागरिक अनेक लाभापासून वंचित आहेत.

केंद्र शासनाच्या हक्काच्या आरक्षणापासून बहुजन समाजातील नागरिक वंचित आहेत. वैद्यकीय प्रवेशासह अनेक स्पर्धात्मक परिक्षेत आरक्षणाची परिपुर्तता होत नसल्याने या समाजातील गुणवंत विद्याथी नौकरीपासूनही वंचित राहत आहेत. अशा अनेक लाभापासून बहुजन समाजातील विविध जाती आजही वंचित आहेत, त्या जातींना केंद्र व राज्य शासनाच्या योजनांचा लाभ मिळावा तसेच शैक्षणिक क्षेत्रात संविधानात तरतुद केलेल्या आरक्षणानुसार लाभ मिळावा, या मुख्य मागणीला घेवून जनजागृती अभियान सुरू आहे.

या अभियानाला तिरखेडी क्षेत्रात चांगला प्रतिसाद मिळत असून न्याय व हक्कासाठी आता त्या क्षेत्रातील नागरिक एक होत असल्याचेही दिसून येत आहे. आयोजित कार्यक्रमात परिसरातील महिलांसह नागरिकांचाही सहभाग मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे.

# जगातील पहिल्या : स्पोर्टी, स्मार्ट, रुबाबदार रेनो काइगरचे भारतात पदार्पण




**नवी दिल्ली:** बऱ्याच काळापासून ग्रुप रेनोकडून त्यांच्या बहुप्रतीक्षित रेनो काइगरने जगाचे लक्ष वेधून घेतले होते. रेनोने ही उत्सुकता आणखी ताणत त्यांच्या रेनो काइगरचे ग्लोबल प्रीमिअर आज भारतात केले. या नवीकोऱ्या आटोपशीर एसयुव्हीचे डिझाईन आणि निर्मिती भारतातच करण्यात आली असून तिचे आंतरराष्ट्रीय अनावरण करण्यापूर्वी रेनोकडून क्रांतिकारी उत्पादनांच्या फळीत नवीन रेनो काइगर भारतात लॉन्च केली. डस्टर, क्विड आणि ट्रायबरप्रमाणे रेनो काइगर देखील या सेगमेंटमधील गतिमानतेची व्याख्या बदलणार आहे. रेनोकडून आणखी एक गेमचेंजरचे वचन राखण्यात काइगर नक्कीच यशस्वी होईल.

रेनो काइगरने अगोदरच स्वत:चे रुबाबदार अस्तित्व प्रस्थापित केले. हिचे व्यक्तिमत्व अतिशय बळकट आहे, याचे श्रेय हिच्या आकर्षक डिझाईनला जाते. रेनो काइगरचे डिझाईन स्पोर्टी आणि पिळदार घटकाने तयार केले असल्याने खऱ्या अर्थाने एसयुव्हीमध्ये आपले वेगळेपण राखते. रेनो काइगरच्या अंतर्गत भागात स्मार्ट केबिन देण्यात आले, यामध्ये तंत्रज्ञान, कार्यशीलता आणि प्रशस्त जागेचा संगम दिसतो. रेनो काइगरला नवीन टबीचार्ज १.० लिटर पेट्रोल इंजिनची शक्ती प्राप्त आहे. जे उच्चतम कामगिरी आणि ड्रायव्हिंग सुख मिळवून देईल. यातील इंजिनची अस्सलता आणि टिकाऊपणाची कसोटी घेण्यात आली आहे. हे उत्पादन ताज्या दमाच्या तंत्रज्ञानाने युक्त असून त्याची झलक रेनोच्या अगोदरच्या ग्लोबल रेंजमध्ये वारंवार दिसली. हे उच्चतम कामगिरी, आधुनिकता आणि कार्यक्षम इंजिन स्पोटी ड्राईव्हची खातरजमा करेल. यामध्ये मल्टी सेन्स ड्राईव्ह मोड्सचा समावेश असून ग्राहकांच्या ड्रायव्हिंग प्राधान्यांना साजेशी लवचिकता प्रदान करतात.

सेल्स आणि ऑपरेशन्स रेनो ब्रँडचे एसव्हीपी फब्रीस कँबोलीव्ह म्हणाले, “डस्टर, क्वीड आणि ट्रायबरनंतर आम्ही आता भारतीय बाजारासाठी सुयोग्य अशी रेनो काइगर ही आधुनिक एसयुव्ही बाजारात उतरविण्याच्या तयारीत आहोत. आमची नाविन्यपूर्ण कार्समधील सर्जनशीलता आणि ग्राहकांच्या गरजांचे सखोल ज्ञान अशा रेनोकडील सवीत्तम गोष्टींचा मेळ घालून काइगरची निर्मिती करण्यात आली आहे. रेनो ही खरोखरच गेम चेंजर असल्याचा हा एक ठोस पुरावाच आहे.”

ग्रुप रेनोचे हेड ऑफ डिझाईन ईव्हीपी लॉरेन्स वान देन ॲकर म्हणाले, “शो–कारचे वचन दिल्याप्रमाणे रेनो काइगर ही खरोखरच मजबूत, गतिशील आणि आरामदायी एसयुव्ही आहे. शहरी गडबड–गोंधळात प्रवास करण्यासाठी सुसज असणाऱ्या या रेनो काइगरची रचना आम्ही लांबच्या प्रवासाच्या आणि कोणत्याही प्रकारच्या रस्त्यांतून वाट काढण्याच्या दृष्टीनेच केली आहे. काइगर ही स्वत:चे वेगळेपण दाखवणारी एसयुव्ही आहे आणि तिच्या लांबलचक व्हीलबेसमुळे आतमध्ये मोकळी प्रशस्त जागा मिळते. या एसयुव्हीच्या “स्मार्ट केबिन’ची रचना आरामदायी आणि शेअरिंगला प्रोत्साहन देण्याच्या हेतूने करण्यात आली आहे.”

रेनो काइगर ही भारताच्या डिझाईन, अभियांत्रिकी आणि निर्मिती क्षमतांचे प्रदर्शन करतानाच “मेक इन इंडिया’ मोहिमेबाबतच्या रेनोच्या ठोस वचनबद्धतेला अधोरेखित करेल. रेनो समुहाने भारतात नेहमीच प्रथा मोडण्यावर आणि नाविन्यपूर्णतेवर लक्ष केंद्रित केले आहे आणि त्यातून आपल्या उत्पादनांचा दर्जा विस्तृतपणे सिद्ध केला आहे. संपूर्ण नव्या रेनो काइगरच्या बाजारात येण्याने रेनो पुन्हा एकदा आपले अस्तित्व दाखवून देईल.

रेनो काइगर आणि भारतीय बाजाराच्या महत्त्वाबाबत आपले मत व्यक्त करताना रेनो इंडिया ऑपरेशन्सचे कंट्री सीईओ आणि व्यवस्थापकीय संचालक वेंकटराम ममिल्लापल्ले म्हणाले, “रेनोने भारतातील आपली घोडदौड सुरुच ठेवली आहे आणि मॅक्रो–इकोनॉमिक वातावरणाला आव्हान देऊन उद्योगाचा ट्रेंड सुधारला आहे. आमच्या ठोस व्यवसाय धोरणाच्या माध्यमातून आम्ही हे साधले आहे आणि यात आकर्षक उत्पादन श्रेणी, दर्जेदार तसेच गुणवत्तापूर्ण आणि ग्राहक केंद्रित उत्पादन तसेच आमचे देशभरात पसरलेले नेटवर्क यांचा मोलाचा वाटा आहे. आमच्या संपूर्णपणे नव्या असलेल्या रेनो काइगरच्या माध्यमातून आम्ही आज आणखी एक पाऊल उचलले आहे. ही एक उत्कंठावर्धक स्पोर्टी, सुपर स्मार्ट आणि आकर्षक अशी बी–एसयुव्ही आहे. केवळ भारतातच नव्हे तर जगभरातील जास्त लोकांना एसयुव्हीचा पर्याय खुला करून देणाऱ्या डस्टरप्रमाणेच रेनो काइगर एसयुव्ही ही देखील पुन्हा एकदा अगदी नव्या ग्राहकांना भुरळ घालेल. या नव्या गेम–चेंजरमुळे आमचा ग्राहक वर्ग मोठ्या प्रमाणात वाढेल असा विश्वास आम्हाला आहे.”

# चौथ्या स्तंभाचा जिल्हाधिकाऱ्याकडून अवमान!



■ पालकमंत्र्यांच्या पत्र परिषदेवर पत्रकारांचा बहिष्कार
■ जिल्हाधिकाऱ्यांच्या भूमिकेचा पत्रकारांनी नोंदविला निषेध

**गोंदिया** : जिल्हा नियोजन समितीच्या सभेनंतर पत्रकारांना पत्र परिषदेसाठी बुधवारी २७ जानेवारी रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात आमंत्रीत करण्यात आले होते. परंतू कार्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वारावरच जिल्हाधिकाऱ्यांच्या निर्देशावर पोलीसांनी अडविले. आमंत्रीत केल्यावरही झालेली अडवणूक म्हणजे पत्रकारांचा अपमान असल्याची भावना सर्व पत्रकारांनी व्यक्त करत पत्र परिषदेवर बहिष्कार टाकला. यात जिल्हाधिकाऱ्यांची माध्यम प्रतिनिधींना आवर्जून दिलेली अपमानजनक वागणूक व निष्क्रिय भूमीका दिसून आली. याची साधी दखल घेत पत्रकारांना भेटण्याचे सौजन्य मंत्री महोदयांनी दाखविले नाही. त्यामुळे लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाचा राज्याचे गृहमंत्र्यांकडूनच चक्क अनादर झाल्याची बाब आजच्या घटनेवरून पुढे आली आहे.

जिल्हा नियोजन समितीच्या सभेनंतर जिल्ह्याच्या विविध विकासासंदर्भात माहिती देण्यासाठी पालकमंत्र्यांची पत्र परिषद घेण्याची परंपरा आहे. त्यानुसार जिल्हा माहिती अधिकाऱ्यांनी दुपारी १:३० वाजता पत्रकरांना आमंत्रीत केले होते. तेव्हा माध्यमांच्या प्रतिनिधींना प्रवेशा संदर्भात कुठलीही सुचना नसल्याचे कारण पूढे करत पोलीसांनी सर्वांना मुख्य प्रवेश द्वारावरच रोखले. वास्तविक जिल्हा नियोजन समितीचे सचिव हे जिल्हाधिकारी असतात, त्यांच्या निर्देशानुसारच जिल्हा माहिती अधिकारी सभेतील विकासासंदर्भातील माहिती जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी पत्र परिषदेचे आयोजन करण्यात येते. ही बाब सर्वश्रृत असताना पोलीसांना याविषयीची महिती न देणे हा संशोधनाचा विषय ठरत आहे. तर पोोलीसांचेही हे कृत्य तेथे उपस्थित असलेल्या माध्यमांच्या प्रतिनिधींसाठी अपमानजनक असेच होते. त्यामुळे पत्रकरांनी पालकमंत्र्यांच्या पत्र परिषदेवर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला. तसेच प्रशासनातील असमन्वयाची बाब पालकमंत्र्यांना कळावी यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वारावर सर्व माध्यमांचे प्रतिनिधी उभे होते. बैठक संपल्यानंतर पालकमंत्री आपल्या ताफ्यातील वाहनातून निघाले. यावेळी त्यांच्यासोबत खा. प्रफूल्ल पटेलही वाहनात बसून होते. परंतू लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाचे महत्व त्यांना नसावे, त्यामुळे त्यांनी माध्यमांच्या प्रतिनिधींशी साधी विचारपूस न करता काच खाली करून पुढे असे होणार नाही असे आपल्या वाहनात बसूनच आश्वासन देत काढता पाय घेतला.

दरम्यान, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक, जिल्हा नियोजन अधिकारी यांनी माध्यमांच्या प्रतिनिधींशी संपर्क साधून पत्र परिषदेसाठी येण्याची विनंती केली. परंतू अडवणूक करून झालेला अपमान हा लोकप्रतिनिधींच्या नाते प्रशासनातील असमन्वयाची बाब पालकमंत्र्यांपुढे मांडावी अशी भावना माध्यमांच्या प्रतिनिधींची होती. मात्र, राज्याचे गृहमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री असूनही लोकशाहीच्या चौथ्यास्तंभाचे महत्व त्यांना कळू नये ही बाब लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाची अनादर करणारीच ठरत आहे.

### सर्व सामान्यांचे काय...

पत्र परिषदेचे आमंत्रण देऊन थेट पत्रकारांचे अनादर करणे त्यातच पालकमंर्त्यांनी पत्रकारांना भेटण्याची तसदी न घेणे ही बाब पचणी पडण्यासारखी नसतानाच पत्रकारांशीच शासन प्रशासनाकडून अशाप्रकारचा व्यवहार होत असेल तर सर्वसामान्यांचे काय असा प्रश्न या निमीत्ताने उपस्थित होत आहे.

### खा. पटेल बघ्यांच्या भूमिकेत ...

पत्रकारांनी पत्रपरिषदेवर बहिष्कार घालत पालकमंत्र्यांना प्रवेश द्वारावरच भेटण्याची भूमिका घेत प्रवेश द्वारावरच ठिय्या मांडला असता पालकमंत्री आपल्या वाहनाच्या बाहेर निघाले नाही. विशेष म्हणजे यावेळी त्यांच्या समवेत खा. प्रफूल्ल पटेलही वाहनात बसून होते, तर ते जिल्ह्याचे स्थानिक नेते असल्याने त्यांच्याकडून पत्रकारांना मोठ्या अपेक्षा होत्या मात्र, त्यांची कृतीही अपेक्षा भंग करणारी ठरली. ते केवळ बघ्याच्या भूमिकेतच दिसून आल्याने पत्रकारांमध्ये खा. पटेल विषयीही रोष दिसून आला.

### माफीयांना प्रवेश...

पत्र परिषदेचे आमंत्रण देऊनही पत्रकारांना मुख्य प्रवेश द्वारावर अडविण्यात आले तर याच वेळी कोट्यवधीची रक्कम थकित असलेले राईस मिलर्स, दारूविक्रेता, वाळू विक्रेत्यांना प्रवेश देण्यात येत होता. त्यामुळे पालकमंत्री हे जिल्ह्याच्या विकासासाठी की स्व:विकासासाठी आले होते. अशा चर्चा जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात रंगल्या होत्या.

# जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी कार्यकर्त्यांनी पुढे यावे:ना.पाटील



**तिरोडा**– फक्त निवडणुकीपुरतेच संपर्कात न राहता कार्यकर्त्यांनी जनतेच्या समस्या जाणून घेतल्या पाहिजे. आणि जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी कार्यकर्त्यांनी पुढे यावे, जेणे करून कार्यकर्त्यांनी जनतेच्या मनात आपली जागा बनविली पाहिजे. या कार्यशैलीमुळेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आज तळागळापर्यत पोहोचलेला आहे. म्हणून बुथ कमिटी तयार करून कार्यकर्त्यांनी जनतेच्या समस्या मार्गी लावावे, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष तथा राज्याचे मंत्री जयंत पाटील यांनी केले.

राष्ट्रवादी काँग्रेस परिवार संवाद दौरा निमित्त (ता.३०) प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांचे जिल्ह्यात आगमन झाले. दरम्यान तिरोडा येथे मतदार संघाच्या कार्यकर्त्यांशी त्यांनी संवाद साधून याप्रसंगी मार्गदर्शन करताना ते बोलत होते. कार्यकर्त्यांनी लोकांच्या प्रश्नांसाठी आंदोलन करण्याची वेळ आली तर कसलीही तमा न बाळगता पुढे यावे, आंदोलन हे जनतेच्या मनात बिंबत असते. म्हणून आपण सत्तेत असोत की नसोत जनतेच्या कामासाठी पुढे येणे काही गैर नाही. गोंदिया जिल्ह्यात अनेक समस्या आहेत. त्या समस्या सोडविण्याकरीता कार्यकर्त्यांनी कामाला लागावे, या जिल्ह्याला खा.प्रफुल्ल पटेल यांच्यासारखे खंबीर नेतृत्व लाभले आहे. त्याचप्रमाणे माजी आमदार राजेंद्र जैन हे देखील या जिल्ह्याच्या समस्या मार्गी लावण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करीत असतात. गोंदिया जिल्ह्यातील अनेक सिंचन प्रकल्पासंदर्भात त्यांनी अवगत करून दिले आहे. प्रलंबित प्रकल्पांना लवकरात लवकर पूर्णत्वास आणण्यासंदर्भात आपण पाऊल उचलणार आहोत. त्याचप्रमाणे काही प्रकल्पांना मंजुरी देण्यात येणार आहे. उद्या जलसिंचन विभागाची आढावा बैठक आहे. या बैठकीत जिल्ह्यातील सर्व प्रकल्पासंदर्भात सविस्तर चर्चा करुन ते कसे मार्गी लागतील, यावर मार्ग काढणार आहोत. मात्र, पक्ष संघटनेच्या बळकटीकरणासाठी तळागळातील कार्यकर्ता मागे पडणार नाही, या बाबीची ग्वाही घ्यायला मी आपल्यापर्यंत पोहोचलो आहे. या जिल्ह्यात निवडणुका असल्यातरी राज्यभरात कुठलेही निवडणूक कार्यक्रम नाही. असे असले तरी आपल्या कार्यकर्त्यांशी संवाद साधणे हे आपले कर्तव्य समजून परिवार संवाद दौरा हाती घेतला आहे. असेही ते म्हणाले.

यावेळी मंचावर माजी आमदार राजेंद्र जैन, आमदार मनोहर चंद्रीकापुरे, आमदार राजू कारेमोरे, माजी खासदार डॉ. खुशाल बोपचे, रविकांत बोपचे, पंचम बिसेन, गंगाधर परशुरामकर, किशोर तरोणे, राजलक्ष्मी तुरकर, केतन तुरकर, केवल बघेले, प्रेम रहांगडाले, अजय गौर, ममता बैस, जगदीश बावणथडे, निता रहांगडाले, मनोज डोंगरे, कैलास पटले, निता राहंगडाले, डॉ. अविनाश जायसवाल, जिब्राहिल पठान, नरेश कुंभारे, प्रभु असाटी, वाय. टी. कटरे, आदी उपस्थित होते.

# वनविभागाने सुकडीतील अतिक्रमण हटविले



**तिरोडा** : तालुक्यातील सुकडी येथील वनविभागाच्या जागेवर अनधिकृत अतिक्रमण केलेल्या अतिक्रमणधारकांना वारंवार सूचना देवूनही त्यांनी अतिक्रमण हटविले नाही. त्यामुळे सदर अतिक्रमण वनविभागाने २८ जानेवारी रोजी बळपूर्वक काढले.

फुलचंद जंगलू शेंडे, रामा जंगलू शेंडे, देवराम नारायण शेंडे व उमेन्द्र शिवचरण बोरकर सर्व रा. सुकडी, ता. तिरोडा असे अतिक्रमणधारकांची नावे आहेत. त्यांच्या अतिक्रमणाबाबत गोंदियाचे सहायक वनसंरक्षक (तेंदू व कॅम्प) यांनी रीतसर सुनावणी घेऊन अतिक्रमण निष्कासनाचे आदेश जारी केले होते. या आदेशाची प्रत देवून व कार्यालयाकडून अतिक्रमण काढण्याची त्यांना अनेकदा सूचना देण्यात आली होती. तरी त्यांनी अतिक्रमण न काढल्याने वन विभागाला बळाचा वापर करावा लागला. अतिक्रमण निष्कासनादरम्यान प्रतिबंधक उपाय म्हणून जेसीबी मशीनच्या मदतीने खोल सलग समतल चर खोदण्यात आले. अतिक्रमणधारकांनी अतिक्रमण केलेल्या जागेवर रोवलेले लोखंडी व सीमेंट कांक्रिटचे एंगल (पोल) जेसीबी मशीनने काढून जप्त करण्यात आले. तसेच तेथे उभारलेले मंडप व झोपडी पाडण्यात आली.

सदर अतिक्रमण निष्कासन उपवन संरक्षक कुलराजसिंग यांच्या मार्गदर्शनात करण्यात आली. यावेळी सहायक वनसंरक्षक आर.आर. सदगीर, तिरोड्याचे वनपरिक्षेत्र अधिकारी एस.के. आकरे, नायब तहसीलदार ए.टी. व्हनकडे, सुकडीचे सरपंच जे.व्ही. गभणे, पोलीस पाटील एम.टी. चौधरी, उपसरपंच एन.एस. बावनथडे, तिरोड्याचे सर्व क्षेत्र सहायक व वनरक्षक, संरक्षक पथक क्रमांक १, गोंदियाचे वनकर्मचारी, पोलीस दल तिरोडा, एसटीपीएफ कर्मचारी, एनएनटीआर व तिरोडा वनपरीक्षेत्रातील वनमजूर उपस्थित होते.

# कनिष्ठ लेखाधिकारी फनेंद्रनाथ हरिणखेडेंचा सेवानिवृत्तीपर सत्कार



**गोंदिया:**– गोंदिया जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागासह गोरेगाव,आमगाव व गोंदिया पंचायत समितीमध्ये गेली ३५ वर्ष कनिष्ठ लेखाधिकारी म्हणून सेवा दिल्यानंतर ३१ जानेवारी २०२१ रोजी वयोमानानुसार फनेंद्रनाथ हरिणखेडे सेवानिवृत्त होत असल्याने त्यांचा गोंदिया पंचायत समितीच्या सभागृहात प्रभारी गटविकास अधिकारी दिलीप खोटेले यांच्या हस्ते शाळश्रीफळ व भेटवस्तु देऊन सत्कार करण्यात आला.१८ ऑगस्ट १९८६ ला तत्कालीन भंडारा जिल्हा परिषदेत त्यांनी नोकरीला सुरवात केली. त्यापैकी ३० वर्ष हे त्यांनी आरोग्य विभागात नौकरी केली.त्यानी नोकरी काळातच उत्तम शेतीलाही चालना देत आपल्या शेतीमध्ये आधुनिक शेतीचा प्रयोग करुन पिक घेण्याच सतत प्रयत्न केलेला आहे.सेवानिवृत्तीनतंर शेतीमध्ये अजून आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन आपला वेळ तिथे घालवण्याचा त्यांनी मानस व्यक्त केलेला आहे.

# आदर्श ग्रामपंचायत कंटगी(बु.)च्यावतीने हळदी कुंकू कार्यक्रमात विद्यार्थिनींचा सत्कार



**गोरेगाव**– तालुक्यातील स्मार्ट व आदर्श ग्रामपंचायत असलेल्या कटंगी बु.येथे ग्रामपंचायतीच्यावतीने(दि.२९) महिलासांठी हळदी कुंकू कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.विशेष म्हणजे याच कार्यक्रमात महिलांना मार्गदर्शनासोबतच गावातील प्रावीण्य प्राप्त विद्याथीर्नींचा सत्कार करण्यात आला.राजगिरी बहु.संस्थेच्या अध्यक्षा रजनी रामटेके यांनी महिलांना यावेळी संविधानिक अधिकाराबद्दल मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सरपंच तेजेंद्र रुपलाल हरिनखेडे होते.कार्यक्रमाचे दीप प्रज्वलन अल्काताई पारधी यांनी केले. प्रमुख अतिथी म्हणून उपसरपंच भीमराज टेंभुणीकर, उषाताई रहांगडाले सरपंच सिलेगाव, पारुल डेमेंद्र रहांगडाले, माजी जिल्हा परिषद सदस्य ललिता चौरागडे, रजनीताई धपाडे सरपंच मोहाडी ,ग्रा.पं सदस्य चंद्रकला नेवारे, चंद्रकला रहांगडाले, भुमेश्वरा मौजे, उर्मिला हरिनखेडे, वैशाली शहारे, ममता दिहार, उमेद CRPF रंजना हरिनखेडे, अंजुबाई चौरागडे, अंगणवाडी सेविका अंजना ठाकरे, भारती कटरे, जीवनकला सिंगाडे, इंदिरा टेंभूणीकर, भुवनेश्वरी हरिणखेडे, ऋषिकांत चौरागडे, दीक्षा चौधरी, तुलसी टेंभरे , भुमेश्वरी रहांगडाले, बेनीराम चौरागडे ,प्रेमलाल भगत, सुनील भोयर ग्राम पंचायत परिचर चंद्रशेखर कावडे ग्रा.पं. रोजगार सेवक नुमेश्वर चौरागडे उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गावातील उमेद व माहीम बचत गटाचे सर्व महिला व गावातील इतर महिला यांनी पूर्ण सहयोग केले.कार्यक्रमाचे संचालन मेघा फाये ग्रा.पं ऑपरेटर, योगेश्वर रहांगडाले यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार ग्रामसेवक अरविंद के साखरे यांनी मानले.


## जाहिरात

गोंदिया जिल्ह्यातील संकटग्रस्त महिलांना तातडीने मदत मिळविण्यासाठी केंद्र शासन पुरस्कृत One Stop Center योजना सुरु करण्यात आलेली आहे. सदर योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार One Stop Center च्या दैनंदीन कामकाजासाठी Implementing Agency नेमावयाची असून सदर एजन्सीमार्फत प्रशिक्षण देणे, कर्मचारी क्षमता बांधणी, तांत्रीक मदत व मानधनी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करणे इत्यादी स्वरुपाचे Agency च्या कामाचे स्वरुप राहील.

करिता स्थानिक जिल्ह्यातील ईच्छुक स्वयंसेवी संस्थांनी अटी व शर्तीची पुर्तता करणाऱ्या संस्थांकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

**अटी व शर्ती :**

१) One Stop Center या योजनेच्या गठीत व्यवस्थापन समितीच्या तसेच शासनाच्या निर्देशानुसार Implementing Agency ला कार्यवाही करावी लागेल. निर्देशानुसार कामकाज न केल्यास एजन्सीची सेवा बंद करण्यात येईल.
२) Implementing Agency करिता आवेदन करणाऱ्या संस्थेला प्रशिक्षण देणे, क्षमता बांधणी करणे, तांत्रीक मदत या क्षेत्रातील अनुभव आवश्यक आहे.
३) आवेदन करणाऱ्या संस्थेच्या घटना/नियमावलीमध्ये महिलांसाठी कार्य करण्याच उल्लेख असलेल्या संस्थेला आवेदन करता येईल.
४) Implementing Agency करिता आवेदन करणाऱ्या संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी मंजूर केलेला ठराव आवेदनासोबत जोडण्यात यावा.
५) अटी व शर्तीचे पालन करण्यासंबंधी रू.100/- रुपयाचे स्टॅम्प पेपरवर हमीपत्र सादर करण्यात यावे.
६) आवेदन करणारी संस्था (अ) संस्था नोंदणी अधिनियम 1860 (ब) सार्व.विश्वस्त अधिनियम 1950 अंतर्गत नोंदणीकृत असणे आवश्यक आहे. (नोंदणी प्रमाणपत्र सोबत जोडावे)
७) संस्था काळया यादीत समावेश नसल्याबाबतचे धर्मदाय आयुक्त यांच्या कार्यालयाचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.
८) आवेदन करणाऱ्या संस्थेची निती आयोगाची नोंदणी आवश्यक आहे.
९) आवेदन करणाऱ्या संस्थेचे मागील तीन वर्षाचे लेखा परिक्षण अहवाल (2017-18,2018-19,2019-20)
१०) आवेदन करणाऱ्या संस्थेच्या कार्याचा वार्षिक अहवाल (मागील तीन वर्षाचा)
११) आवेदन करणारी संस्था ही स्थानिक गोंदिया जिल्ह्यातीलच असावी.
१२) Implementing Agency करिता नियुक्ती झालेल्या संस्थेने त्यांच्या कार्यकारणी मंडळातील सर्व सदस्यांचे पोलीस पडताळणी अहवाल (चारित्र्य प्रमाणपत्र) सादर करावे लागेल. व त्यामध्ये सदस्यांवर फौजदारी किंवा अन्य कुठल्याही प्रकारचा गुन्हा आढळून आल्यास सदर संस्थेची नियुक्ती रद्द करण्यात येईल.
१३) आवेदन अर्ज वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून 15 दिवसाचे आत **जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, गोंदिया-नविन प्रशासकीय ईमारत, तीसरा मजला, खोली क्रमांक 36 जयस्तंभ चौक, गोंदिया** ता.जि. गोंदिया येथे प्रत्यक्ष सादर करावा. विलंबाने आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.
१४) आवेदन करणाऱ्या संस्थेने अर्ज स्वच्छ व सुवाच्छ अक्षरात परिपूर्ण भरुन सादर करावे. अपूर्ण असलेले अर्ज स्वीकारले जाणार नाही.

**स्वा/-**
**जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, गोंदिया**

**अर्जाचा नमुना**

प्रति, मा. जिल्हाधिकारी तथा, अध्यक्ष,
One Stop Center व्यवस्थापन समिती,
गोंदिया.

**विषय :** Implementing Agency **करिता आवेदन सादर करित असलेबाबत...**

| अ.क्र. | आवेदक संस्थेची माहिती | माहिती |
|---|---|---|
| १ | संस्थेचे नाव : | |
| २ | संपुर्ण पत्ता व संपर्क क्रमांक : | |
| ३ | संस्था नोंदणी प्रमाणपत्र क्रमांक व दिनांक : (प्रत सोबत जोडावी) | |
| ४ | संस्थेची घटना व नियमावली (प्रत सोबत जोडावी) | |
| ५ | संस्थेच्या कार्यकारणी मंडळाची यादी : (नांव, पत्ता व संपर्क क्रमांकासह) | |
| ६ | संस्थेच्या Implementing Agency करिता आवेदन करण्याबाबतचा सर्व सदस्यांनी मंजुर केलेला ठराव (प्रत सोबत जोडावी) | |
| ७<br>८ | रू.100/- रुपयाचे स्टॅम्प पेपरवर सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे हमीपत्र व प्रतिज्ञापत्र.<br>अनुभव प्रमाणपत्र | |
| ९ | संस्थेचे मागिल तीन वर्षाचे लेखा परिक्षण अहवाल (2017-18,2018-19,2019-20) | |
| १० | संस्था काळया यादीत समावेश नसल्याबाबतचे धर्मदाय आयुक्त यांचे प्रमाणपत्र क्र.व दिनांक (प्रत सोबत जोडावी) | |
| ११ | संस्थेच्या कार्याचा वार्षिक अहवाल (मागिल तीन वर्षाचा) | |
| १२ | निती आयोगाचे नोंदणी प्रमाणपत्र क्र. व दिनांक (प्रत सोबत जोडावी) | |
| १३ | इतर वरिल प्रमाणे आवश्यक दस्ताऐवज. | |

दिनांक :

**आवेदकाची स्वाक्षरी**
**नाव,पदनाम,पत्ता व संपर्क क्रमांक**

क्र.जिमाका/गो/जाहि/26/2021



## विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर

(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत उपक्रम)

**कार्यकारी अभियंता** मध्यम प्रकल्प विभाग, गोंदिया ४४१६०१

ई–मेल–mpdg.gondia@gmail.com

**ई-निविदा सुचना क्र.०३ सन २०२०-२१**

**संकेत स्थळ :** http://mahatenders.gov.in

**मंडळ :** अधीक्षक अभियंता, नागपूर पाटबंधारे मंडळ, नागपूर

**विभाग :** कार्यकारी अभियंता, मध्यम प्रकल्प विभाग, गोंदिया

**पत्ता :** सुभाष बोस गार्डन जवळ सिव्हिल लाईन गोंदिया दु.: ०७१८२–२३४८३२

कार्यकारी अभियंता मध्यम प्रकल्प विभाग, गोंदिया ह्यांचे खालीली कामाकरीता महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडे योग्य त्या वर्गात पंजीकृत असलेल्या कंत्राटदाराकडून ऑनलाइन ई–निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या http:mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावे. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाची एकुण अंदाजीत किंमत (लक्ष) | इसारा/बयाना रक्कम (लक्ष) | ई–निविदा संचाची किंमत | पात्रता | काम पूर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | तेढवा शिवनी उपसा सिंचन योजनेच्या उजवा कलव्या वरुन सा.क्र.८८८० मी वरुन भद्याटोला लघु कालव्याकरिता भूमिगत बंद नलिका द्वारे सिंचन करिता रेल्वे ओलाडंणी चे बांधकाम. | रू.४७.५६ लक्ष | रू.०.४८ लक्ष | रू.२०००+१२% जीएसटी= २२४०/– | वर्ग ५ व त्यावरील | ४ महिने (पावसाळा धरुन) |
| २ | बावनथडी प्रकल्पाअंतर्गत नेरला लघु कालव्यातील यंत्रणेचे दुरुस्तीचे काम. | रू.७.९८ लक्ष | रू.०.०८ लक्ष | रू.२०००+१२% जीएसटी= २२४०/– | वर्ग ७ व त्यावरील | ३ महिने |

**अ) ई-निविदा उपलब्ध कालावधी :-** दिनांक २५/०१/२०२१ ते ०८/०२/२०२१ १७.४५ वाजेपर्यंत
**आ) निविदा पुर्व बैठक :-** लागू नाही
**इ) निविदा उघडणे :-** दिनांक ११/०२/२०२१ **(वेळ १२.०० वाजता)**

(सदर निविदे सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास फक्त वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)
१) आंतरराष्ट्रीय कंत्राटदार यांची उप कंपनी भारतीय असेल तरच या निविदेत भाग घेऊ शकतील.
२) सदर कामाकरिता पश्चात मुल्यांकन पद्धत लागू आहे.
३) कार्यकारी अभियंता कार्यालयातून ई–निविदा कोरे प्रपत्रे विकली जाणार नाहीत.
४) सविस्तर ई–निविदा सुचना महाराष्ट्र शासनाच्या इलेक्ट्रानिक टेन्डर management http://mahatenders.gov.in वर तसेच कार्यकारी अभियंता कार्यालयातील नोटीस बोर्डवर पहावयास मिळेल.
५) या कामाचे अंदाजपत्रक, दर, विश्लेषण, मोजमापे नकाशे इ.कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे.

**जावक क्र. १३८/निलि/२०२१ दिनांक :- १९/०१/२०२१**

**कार्यकारी अभियंता**
मध्यम प्रकल्प विभाग,
गोंदिया

संचालक/माहिती नाग/४९६

